दै. सकाळ (1) 11/9

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न

## राजकीय बॅनरबाजी सोबतच मतदानासाठी जनजागृती मोहीम

**जयपाल गायकवाड**

नांदेड, ता. १० : नांदेड महापालिका सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यानंतर आता महापालिका प्रशासनाच्या वतीने मतदानासाठी जनजागृती करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. 'मी मतदान करणारच' असे जनजागृती करणारे बॅनर शहरातील विविध ठिकाणी लावण्यात आले असून ते नांदेडकरांचे लक्ष वेधून घेत आहेत.

यंदाच्या महापालिका निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे, या उद्देशाने नांदेड महापालिकेने शहरभर बॅनर लावण्यास सुरवात केली आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाकडून सतत नवीन युक्ती लढवली जात आहे. मागील निवडणुकीपेक्षा या वेळेसच्या निवडणुकीत मतदानाच्या टक्यात वाढ व्हावी, यासाठी निवडणुकीच्या धामधुमीत राजकीय बॅनरबाजी सुरू असतानाच नागरिकांना देखील मतदानाचा विसर पडू नये, यासाठी पालिकेने जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवत मतदारांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. शहरात सध्या भाजप व कॉंग्रेसने मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करून लक्ष वेधण्यास सुरवात केली आहे. तसेच राजकीय पक्षांकडून मतदान करण्याचेही आवाहन करण्यात येते, पण मतदानाची टक्केवारी वाढल्यास ते कुणाला मिळणार याचीही धास्ती राजकीय पक्षांना वाटत असते.

महापालिका निवडणुकीसाठी नांदेड उत्तर आणि नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीवरुन प्रभाग एक ते २० च्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार





केली आहे. महापालिकेच्या २० प्रभागांसाठी तीन लाख ९६ हजार ८७२ मतदार आहेत. त्यात दोन लाख सहा हजार ४२१ पुरुष मतदार तर एक लाख ९० हजार ४०८ महिला मतदार आहेत. इतर मतदारांची संख्या ४३ आहे. ऑक्टोबर महिन्यात ११ तारखेला मतदान असून अजून एक महिना असला तरी महापालिकेडून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

दै. प्रजावाणी (2)

# दुसऱ्या दिवशीही अंतिम मतदारयादीची प्रसिद्धी नाही

नांदेड, दि. १० : अंतिम मतदारयादी प्रसिद्धीसाठी दोन दिवसांची मुदतवाढ दिल्यानंतरही ही प्रक्रिया गेल्या ४८ तासात अद्याप पूर्ण होऊ शकली नाही. शनिवारी प्रसिद्ध करणे आवश्यक असलेली यादी रविवारीदेखील प्रसिद्ध झाली नसल्याचे मनपाच्या निवडणूक विभागातून मान्य करण्यात आले. याबाबत राज्य निवडणूक आयोग आणि महाऑनलाईन एजन्सीशी सातत्याने संपर्क सुरू असून रात्री उशिरापर्यंत यादी संकेतस्थळावर अपलोड होण्याची अपेक्षा महापालिकेकडून व्यक्त करण्यात आली.



## ▪ महाऑनलाईनचा प्रतिसाद नाही

नांदेड महापालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम गेल्या बुधवारी (दि.६) राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर सर्वांचे लक्ष प्रभागनिहाय अंतिम मतदारयादीकडे लागले आहे. ही यादी शनिवारी (दि.७) जाहीर होणार होती. परंतु, यादी संकेतस्थळावर अपलोड करण्याची जबाबदारी दिलेल्या महाऑनलाईन कंपनीच्या दिरंगाईचा सामना इच्छुक उमेदवार, राजकीय पक्षाचे पदाधिकारी व मतदारांना करावा लागत आहे. शनिवारी सायंकाळपर्यंत महापालिकेच्या संकेतस्थळावर अंतिम प्रसिद्ध झाली नव्हती. दुपारीच निवडणूक विभागाने महाऑनलाईन एजन्सीला नोटीस बजावून तत्काळ खुलासा मागितला आणि अंतिम यादी प्रसिद्ध करण्याचे कळविले असले तरी, सदर एजन्सीने त्याची पूर्तता रविवारी

▪पान २ वर

### दुसऱ्या दिवशीही अंतिम...

दिवसभरात केली नाही.

इच्छुक उमेदवार व राजकीय कार्यकर्त्यांनी अंतिम यादी पाहण्यासाठी महापालिकेचे संकेतस्थळावरही कोणताही प्रतिसाद दिसून आला नाही. अंतिम यादी पाहण्यासाठी मनपाच्या झोन कार्यालयातही अपेक्षित प्रतिसाद दिला जात नव्हता. तेथे असलेल्या केवळ एकच यादीवर सर्वांच्या उड्या पडत होत्या. त्यातही मतदारांची छायाचित्रे नसल्यामुळे नेमकी ओळख पटण्यात अडचण येत होती. अंतिम यादी कधी एकदा जाहीर होते, याची इच्छुक उमेदवार व मतदारांना प्रतिक्षा असून त्यानंतरच प्रभागातील मतदारांच्या संख्येचे चित्र स्पष्ट होणार आहे.

दै. पुण्य नगरी (1)

919

# मनपाची मतदार यादी क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उपलब्ध

नांदेड/ प्रतिनिधी

नांदेड वाघाळा मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मनपाने मतदार यादी प्रसिध्द केली आहे. ही यादी १ ते २० प्रभागातील असून प्रभागनिहाय मतदार यादी जनतेच्या माहितीस्तव व पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालय अ-तरोडा-प्रभाग क्रमांक १,२ व ३. क्षेत्रीय कार्यालय ब शिवाजीनगर/अशोकनगर-प्रभाग क्रमांक ४,५,६,७,८,९,१०. क्षेत्रीय कार्यालय क-इतवारा/वजिराबाद-प्रभाग क्रमांक ११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८. क्षेत्रीय कार्यालय ड-सिडको/वाघाळा-प्रभाग क्रमांक १९,२०. तसेच ही मतदार यादी मनपाच्या www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध असल्याचे मनपा आयुक्तांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

दै. उ. मराठवाडा (2)

# मनपा निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची निवडणूक लागली असून या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधित क्षेत्रीय कार्यालयात मतदारांना यादी पाहण्यासाठी खुली करण्यात आली आहे.

नांदेड महापालिकेच्या प्रभाग क्र. १ ते २० मधील मतदार यादी दि. ६ सप्टेंबर रोजी निश्चित करण्यात आली होती. दि. १ जुलै रोजी अस्तित्वात आलेल्या ८६ उत्तर नांदेड व ८७ दक्षिण नांदेड विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीवरून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्र. १ ते २० च्या निवडणुकीसाठी तयार केलेली प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागवून त्यावर अंतिम निर्णय घेऊन मतदार यादी जनतेच्या माहितीसाठी व पाहण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या वेळात क्षेत्रीय कार्यालय क्र. १ अ – तरोडा येथे प्रभाग क्र. १, २, ३, क्षेत्रीय कार्यालय क्र. ब शिवाजीनगर/अशोकनगर – येथे प्रभाग क्र. ४, ५, ६, ७, ८, ९, १०, क्षेत्रीय कार्यालय क्र. ३ क – इतवारा/वजिराबाद येथे प्रभाग क्र. ११, १२, १३, १४, १५, १६, १७ व १८ आणि क्षेत्रीय कार्यालय क्र. ४ ड – सिडको/वाघाळा येथे प्रभाग क्र. १९ आणि २० प्रभागांची मतदार यादी पाहण्यासाठी उपलब्ध केली आहे तसेच महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे मनपा आयुक्तांनी कळविले आहे.

दै देशोन्नती (३)

# आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी - आयुक्त

प्रतिनिधी / ८ सप्टेंबर

नांदेड : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी पुढील महिन्यात होवु घातलेल्या निवडणुक संदर्भात लागु झालेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी दिले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची निवडणुक ऑक्टोबर महिण्यात होणार आहे. त्याअनुषंगाने ६ सप्टेंबर पासुन राज्य निवडणुक आयोगाने आचारसंहिता लागु केली आहे. आदर्श आचारसंहितेचा कोणाकडुनही भंग होणार नाही या दृष्टीकोनातुन ७ सप्टेंबर रोजी मनपा आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील पोलीस अधिकारी, मनपा अधिकारी, मुद्रणालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी आयुक्त देशमुख यांनी आदर्श आचारसंहितेबाबत माहिती देवुन अधिकाऱ्यांना नेमुण दिलेल्या कार्यक्षेतत्रात महाराष्ट्र शासन राजपत्र २८ ऑगस्ट १९९५ नुसार आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी असे आवाहन मनपा आयुक्त देशमुख यांनी केले आहे.



आचारसंहितेच्या दृष्टीकोनातुन २८ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत भरारी पथक स्थापन करण्यात येणार आहे. निवडणुकीत पोलीस विभागाकडुन देण्यात येणाऱ्या लाऊडस्पिकर, सभेच्या जागा यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत आणि शहरातील सर्व परवानाधारक मुद्रणालयाकडुन छापील साहित्य जसे बॅनर, पॉम्प्लेट छापत असताना मनपा कडुन देण्यात आलेल्या प्रपत्रानुसार प्रकाशक, मुद्रणालयाचे नावं, परवाना क्रमांक, कालावधी, प्रतिची संख्या आदी विषयी ठळक अक्षरात उल्लेख करणे अनिवार्य राहणार आहे. अन्यथा शहरामध्ये विनापरवाना मुद्रण करीत असेल तर मुद्रांक धारकाविरुध्द कडक कार्यवाही करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहे.

दै प्रजावाणी (५)

# उमेदवारी अर्जासोबतच ए-बी फॉर्म बंधनकारक

नांदेड, दि. ८ : येत्या ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी राजकीय पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना पक्षाचा ए-बी फॉर्म उमेदवारी अर्ज दाखल करतानाच सादर करणे बंधनकारक आहे. सक्षम उमेदवाराची निवड करण्याकरीता राजकीय पक्षांना या प्रक्रियेमुळे काहीसा कमी कालावधी मिळणार असला तरी, बंडखोरांचे वादळ रोखण्यासाठीही त्याचा उपयोग होणार आहे.



## जातवैधता प्रमाणपत्रात सवलत

मागच्या निवडणुकीत उमेदवारी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र देणे बंधनकारक केले होते. परंतु, या निवडणुकीत जात प्रमाणपत्र व त्याच्या वैधता प्रमाणपत्रासाठी दिलेल्या अर्जाची पोच पावती नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे बंधनकारक आहे. निवडून आल्यानंतर संबंधित उमेदवारास सहा महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.




महापालिका निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर इच्छुक उमेदवार व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून पूर्वतयारीला वेग आला आहे. वेगवेगळ्या प्रभागातील इच्छुक उमेदवारांची यादी केली जात असून, संबंधित प्रभागात अन्य पक्षाकडून कोण उमेदवार निवडणूक रिंगणात राहू शकतो, याचाही अंदाज बांधला जात आहे. चार सदस्यांचा प्रभाग झाल्यामुळे मतदारांची संख्या खूप मोठी आहे. शनिवारी (दि.९) मतदारांची अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर कोणत्या समाजाचे/ धर्मांचे किती मतदार प्रभागात आहेत, याचे गणित मांडून इच्छुक उमेदवार आपला दावा आणखी प्रबळ करणार आहेत.

पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळण्यासाठी इच्छुकांनी वेगवेगळ्या पर्यायाचा अवलंब करून जास्तीतजास्त शिफारशी आपल्या बाजूने झाल्या पाहिजेत, याकरीता जोर लावला आहे.

येत्या १६ ते २३ सप्टेंबर या दरम्यान इच्छुकांना उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. राजकीय पक्षांनी प्राधिकृत करावयाच्या उमेदवारांना आपल्या अर्जासोबतच पक्षाचे ए-बी फॉर्म सादर करावे लागणार आहे. हे फॉर्म जास्तीतजास्त २३ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अथवा मनपा आयुक्त यांच्याकडे प्रत्यक्ष हजर राहून सादर करावयाचे आहेत. ए-बी फॉर्म नसल्यास पक्षाचे अधिकृत निवडणूक चिन्ह दिले जाणार नाही. अशा वेळी संबंधित उमेदवारास आयोगाने नेमून दिलेल्या मुक्त चिन्हापैकी एका चिन्हाची निवड करावी लागणार आहे.